ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २८ ऑगस्ट, १९५७ | अंक ३५

## विविध माहिती

**जबलपूर कॉर्पोरेशनला मदत**—जबलपूर शहरांतील लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी कॉर्पोरेशननें भारत सरकारकडे आर्थिक मदत मागितली होती. कॉर्पोरेशननें आखलेली योजना पार पाडण्यासाठी ८४ लाख रुपये खर्च येणार आहे. मध्यवर्ती सरकारनें ४२ लाख रुपये कर्जाऊ देण्याचें कबूल केल्याची वार्ता आहे.

**अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी**— पाकिस्तानांत भासत असलेला अन्नधान्याचा तुटवडा भरून काढण्याचा एक उपाय म्हणून पश्चिम पाकिस्तान सरकारनें सरकारी मालकीची २ लाख, ७२ हजार एकर जमीन शेतकऱ्यांना भाडेपट्टयानें दिली आहे. ह्या जमिनींत त्यांनीं अन्नधान्याची लागवड करावयाची आहे. शेतकऱ्यांना तगाई कर्जें देण्यासाठी २८ लाख रुपये मंजूर करण्यांत आले आहेत.

**मराठवाड्यांतील वाहतुकीची सोय**—मुंबई राज्यांतील मराठवाडा विभागांत प्रवाशांच्या वाहतुकींत वाढ होत आहे. वाढलेल्या वाहतुकीची सोय करण्यासाठी राज्याच्या स्टेट ट्रॅन्सपोर्ट व्यवस्थेनें ५२ नव्या बसेसची खरेदी केली आहे. प्रत्येक गाडींत ४८ उतारू बसण्याची सोय आहे, व तिची किंमत ४७ हजार रुपये आहे.

**रशिअन राष्ट्रगटांशीं अधिक व्यापार**—अमेरिकेच्या व्यांपारखात्याच्या चिटणिसांनीं दिलेल्या माहितीप्रमाणें रशिआच्या कक्षेतील राष्ट्रांशीं अमेरिका करीत असलेल्या व्यापारांत वाढ झाली आहे. चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत अमेरिकेनें पूर्व युरोपांतील देशांना ५७ लाख, १८ हजार डॉलर्स किंमतीचा माल निर्यात केला.

**जपानला चहाची मदत**—जपानमध्यें नुकत्याच झालेल्या पुरामुळें हजारों लोक आपत्तींत सांपडले आहेत. त्यांना मदत म्हणून भारताच्या सरकारनें ३,००० पौंड चहा पाठविला आहे. भारताच्या जपानमधील वकिलातीनें प्रत्येकी ६० पौंडांच्या ५० पेट्या जपानच्या परराष्ट्रीय वकिलाला दिल्या. चहा विमानानें टोकिओला पोंचविण्यांत आला.

**अणुयुद्धाच्या भीतीचा प्रभाव**—ब्रिटनमधलि ब्लॅकपूल ह्या गांवीं अणुयुद्धाच्या भीतीनें एका जोडप्यानें आत्महत्या केली आणि आपल्या आत्मघातापूर्वी स्वतःच्या तीन मुलींना विषारी वायूच्या साह्यानें यमसदनास पाठविलें! मुलींच्या आईनें लिहिलेल्या अखेरच्या पत्रांत अणुयुद्धांत लहान मुलांना विशेष धोका असल्यानें त्यांना भयानक रीतीनें येणाऱ्या मृत्यूपासून वांचविण्यासाठी हा मार्ग आपण पत्करला असें लिहिलें होतें.

**भारताच्या प्रगतीचा आढावा**—'मेलबर्न हेरल्ड' वृत्तपत्राच्या दिल्ली येथील बातमीदारानें गेल्या दहा वर्षांत भारतानें केलेल्या प्रगतीचा आढावा घेऊन चीननें कम्युनिझमच्या पद्धतीनें केलेल्या प्रगतीशीं भारतानें लोकशाही पद्धतीनें केलेल्या प्रगतीची तुलना करतां येईल काय, असा प्रश्न उपस्थित केला आहे. भारतानें पाश्चिमात्य राष्ट्रांच्या साह्यानें आपलें औद्योगीकरण साधलें तर कम्युनिझमला वाव मिळणार नाहीं असें त्याचें मत आहे.

**जपानच्या तज्ज्ञांचा सल्ला**—मुंबईमधील रेल्वेवहातुकीवर पडणारा ताण कमी करण्यासाठी भुयारी रेल्वे बांधण्याचें घाटत आहे. ह्या कामीं कॉर्पोरेशनला सल्ला देण्यासाठी एका जपानी कंपनीची निवड करण्यांत आली होती. भुयारी रेल्वे मार्गाची प्राथमिक पहाणी करण्यासाठी कंपनीचे तीन तज्ज्ञ मुंबईला आले आहेत.

**रेल्वेसाठी पोलादाची खरेदी**—भारताच्या रेल्वे बोर्डाचा एक प्रतिनिधी रेल्वेसाठी पोलाद खरेदी करण्याकरितां परदेशांत जाऊन आला. रेल्वे रस्त्यासाठी लागणाऱ्या मालाची ३० ते ४० कोटी रुपये किंमतीची खरेदी सोइस्कर अटींवर करण्यांत आली असल्याचें त्यानें सांगितलें. मालवाहू डब्बे बांधण्यासाठी लागणाऱ्या २०,००० टन पत्र्यांची मागणीहि त्यानें नोंदविली आहे.

**सहकारी सोसायट्यांना सवलत**—केरळ राज्यांतील काथ्याच्या सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जावर ज्या दरानें व्याज घेण्यांत येतें त्यांत कपात करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. आतांपर्यंत ह्या संस्थांना ४॥ टक्क्यानें व्याज द्यावें लागत होतें. ह्यापुढें त्यांना फक्त २॥ टक्के दरानें व्याज द्यावें लागणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### नागपूर येथील आर्थिक परिषद

नागपूर विश्वविद्यालयाच्या दीक्षान्त सभागृहांत कुलगुरु श्री. अण्णासाहेब मंगलमूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली नागपुरांतील अर्थ-प्राध्यापकांची एक सभा होऊन त्यांत डिसेंबरांत होऊं घातलेल्या अर्थशास्त्रविषयक परिषदेच्या प्राथमिक तयारीचा प्रारंभ झाला. न्या. मू. मंगलमूर्ति यांनीं परिषदेबद्दलची संपूर्ण माहिती सांगितल्यावर सभेनें कामाची सुरुवात होण्याच्या दृष्टीनें कांहीं उपसमित्या निवडल्या.

नागपूर विश्वविद्यालयाच्या अर्थशास्त्रविभागाचे प्रमुख श्री. मा. ह. मुंजे हे परिषदेचे स्थानिक कार्यवाह होते. परंतु प्रकृति-अस्वास्थ्यामुळें त्यांनीं आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यामुळें आतां नागपूर महाविद्यालयांतील प्रा. सु. द. झळ यांची नवे कार्यवाह म्हणून नेमणूक झाली आहे. या परिषदेबरोबरच कृषि-विषयक अर्थशास्त्राची आणि वाणिज्यविषयक परिषद् नागपूर येथेंच होणार आहेत.

### वनस्पति 'तुपां'त दहा टक्के सरकीचें तेल मिसळणार

वनस्पति 'तुपा'च्या कारखानदारांची सभा नवी दिल्ली येथें भरली होती. त्या सभेनें मध्यवर्ती उद्योगमंत्र्यांनीं सुचविल्याप्रमाणें वनस्पति 'तुपां'त १० टक्के सरकीचें तेल मिसळण्यास मान्यता दिली आहे. त्याचा हेतु निर्गतीसाठीं अधिक वनस्पति उपलब्ध व्हावें, असा आहे. भुइमुगाच्या जागीं सरकीचें तेल वापरावयाचें, त्याकरितां भारत सरकार ३०,००० टन सरकीचें तेल आयात करून वनस्पति कारखानदारांना उपलब्ध करून देईल. सरकीचें तेल भारतांतच तयार करण्यासाठीं यंत्रसामुग्री बसविली, म्हणजे तें येथेंच जरूर तेवढें मिळूं शकेल. सध्या सरकीचें तेल फार महाग आहे; पण उत्पादन वाढल्यावर त्याची किंमत खाली जाईल.

### युवराज चार्लस इतर सामान्य मुलांप्रमाणें शाळेंत जाणार

ब्रिटिश गादीचा वारस, युवराज चार्लस, हा आतां लवकरच ९ वर्षांचा होईल. परंपरा मोडून, त्याला बोर्डिंग स्कूलमध्यें शिक्षणासाठीं पाठविण्यांत येणार आहे. ज्या शाळेंत त्याचे वडील ड्यूक ऑफ एडिंबरो हे शिकले, त्याच शाळेंत आतां युवराजहि शिक्षण घेईल. इंग्लंडच्या आतांपर्यंतच्या सर्व राजांचें शिक्षण राजवाड्यांतच, खासगी रीतीनें झालेलें आहे. चार्लसची आई, सध्यांची राणी, हीहि कधीं शाळेंत गेली नव्हती.

### अमेरिकेंतील लोकसंख्येपैकीं लाखांत ११४, इतके तुरुंगांत

अमेरिकेंतील तुरुंगांत एकूण १,८८,७३० कैदी आहेत. गेल्या वर्षीपेक्षा ही संख्या २% ज्यास्त आहे. १ लाख लोकसंख्येशीं ११४ कैदी, असें प्रमाण पडतें.


पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक, लि.

**नोटीस**

बँकेच्या सासवड शाखेसाठीं सासवड गांवांत भरवस्तींत अगर बाजारपेठेंत घर अगर मोकळी जागा खरेदी करावयाची आहे. तरी ज्या कोणास अशी घर अगर जागा बँकेस विकत देण्याची इच्छा असेल त्यांनीं खालील पत्त्यावर मिळकतीच्या तपशीलवार माहितीसह आपले अर्ज ता. ३१-८-५७ अखेरपर्यंत दाखल होतील असे पाठवावेत.

पुणें सें. को. बँक लि.
पो. बॉ. नं. ५११
पुणें २.

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर


खर्चांत बचत करा व पैसा शिलकींत टाका

सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
जनता बचत योजना
व्याज : २½ टक्के
शाखा:
फोर्ट, दादर, माहिम,
पुणें, बेळगांव.





माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.






इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची ओपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. २८ ऑगस्ट, १९५७





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## चलन आणि हुंडणावळ ह्यांच्या दुखण्यावर तातडीचे उपाय

### सरकारच्या चुका सुधारायला बँकांवर नियंत्रणें आणि ग्राहकांना ताण

निर्गतीपेक्षा आयात जास्ती होत राहिली आहे, त्याचे गंभीर परिणाम आतां तीव्रतेनें जाणवूं लागले आहेत. जानेवारी ते मे, १९५७ ह्या पांच महिन्यांतच आयात–निर्गतीमध्यें १४३ कोटी रुपयांची तफावत पडली ! भारतांतील जिनसांच्या किंमती उतरविण्यासाठीं त्या जिनसांची आयात करण्यांत परराष्ट्रीय हुंडणावळीची मार्गें बरीच उधळपट्टी झाली आणि परदेशांतील शिल्का वापरून संपविण्यांत येऊं लागल्या. पुढील राष्ट्रीय गरजांचा त्यावेळीं विचारच झाला नाहीं. आतां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठीं मोठ्या प्रमाणावर आयातीचा कार्यक्रम असून तो पार पडणें कठीण जाणार आहे. परदेशांचें आर्थिक साहाय्य मिळणें व तेथें कर्जें उभारतां येणें अधिकाधिक अवघड होत चाललें आहे. भारताच्या आर्थिक व औद्योगिक योजना अतिशय खर्चाच्या असून त्या किफायतशीर ठरणार नाहींत, असें मत परदेशांत व्यक्त केलें जात आहे. परदेशांना आधींच नोंदविलेल्या ऑर्डरींचें पैसे चुकते करण्यासाठीं भारताला इतर उपाय अपुरे पडले तर स्टर्लिंग शिलकांचा आणखी उपयोग करून, त्यांचा हिंदी चलनाला असलेला आधार कमी करावा लागेल; म्हणजे आर्थिक अडचणींत चलनविषयक अडचणींची भर पडेल. अशा परिस्थितींत सरकारला सळो कीं पळो झालें असून, शक्य त्या मार्गांचा अवलंब करून परिस्थिति आटोक्याबाहेर जाऊं न देण्याचे प्रयत्न चालूं आहेत. त्या प्रयत्नांच्या प्रत्यक्ष परिणामांच्या मानानें जनतेची गैरसोय कितीतरी अधिक होणें क्रमप्राप्त आहे.

रिझर्व्ह बँकेच्या १९५६ च्या आढाव्यांत ह्या परिस्थितीचें अप्रत्यक्ष दिग्दर्शन दिसून आलेंच होतें, आणि गेल्या वर्षांतील बँकांच्या व्यवहारांतील वाढ त्यांना किफायतशीर झाली तरी पुढें ती आवरावी लागेल त्यावेळीं जाचक ठरणार, हें दिसतच होतें. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं बँकांना दिलेल्या ताज्या सूचनांकडे त्या दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. त्यांनीं बँकप्रमुखांना खालील-प्रमाणें ‘ सल्ला ’ दिला आहे :—

“ धान्याच्या तारणावर कर्जें देऊं नका अशी सूचना रिझर्व्ह बँकेनें आतांपर्यंत दोन वेळां बँकांना दिली; पण या सूचनेकडे बँकांनीं दुर्लक्ष केलें व गेल्या वर्षीपेक्षा यंदा धान्याच्या तारणावर अधिक कर्जें दिलीं गेलीं आहेत. आतां ही शेवटची सूचना मी देत आहे. यापुढें जर बँकांनीं ही सूचना मनावर घेतली नाही तर भारत सरकार स्वतः या बाबतींत परस्पर बँकांवर नियंत्रण आणल्याशिवाय राहणार नाहीं. कारण, अन्नधान्यांच्या किंमती हा भारत सरकारनें प्रतिष्ठेचा प्रश्न मानला आहे याची जाणीव बँकांनीं ठेवावी. या बाबतींत तपशीलवार चर्चा करण्यासाठीं मला भारत सरकारचें निमंत्रण आलें आहे. या चर्चेला जाण्यापूर्वी मला तुम्ही आपापल्या शाखांवर योग्य वचक बसवून धान्यावरील तारण कमी करणार कीं नाहीं, यासंबंधींचें निश्चित आश्वासन हवें आहे. येत्या दोन महिन्यांत ७५ कोटी रुपयांनीं बँकांनीं आपलीं दिलेलीं कर्जें कमी केलीं पाहिजेत. ८०० कोटी रुपये ही या बाबतींत कमाल मर्यादा आहे. १२ जुलै, १९५७ रोजीं ९०४ कोटी रुपये बँकांनीं कर्जें म्हणून दिलेलें होतें. आतां २२ कोटी रुपयांनीं तें कमी झालें असलें तरी त्याचें प्रमाण अजूनहि कमी झालें पाहिजे. मात्र त्याचा परिणाम औद्योगिक कर्जावर होतां कामा नये.

“ व्यापाऱ्यांना पैसा ‘ महाग ’ करणें व कर्जें देण्यावर बंधनें घालणें या आर्थिक शस्त्रांचा चलनवाढीविरुद्ध उपयोग करावा असें इंटरनॅशनल मोनेटरी फंड व जागतिक बँक यांनीं सुचविलें आहे. या जागतिक संघटनांकडून भारतानें कर्जें घेतलीं आहेत व यापुढेंहि त्यांच्या कर्जांची भारताच्या विकास–योजनांसाठीं आवश्यकता आहे. तेव्हां त्यांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करणें भारताला परवडणार नाहीं. ”

“ गेल्या वर्षी बँकांनीं १५० कोटी रुपये मागितले. रिझर्व्ह बँकेनें ते दिले. यंदा बँकांना २०० कोटी रुपये लागणार आहेत; पण आतां बँकांनीं आमच्या सूचनांकडे दुर्लक्ष केलें तर एवढी रकम देणें शक्य होणार नाहीं. बँकांनीं आपल्या ग्राहकांपेक्षा देशाचें हित पाहावें.”

---

### १९५६ मध्यें आयुर्विम्याचें काम इतकें कमी कां झालें ?

१९५६ मध्यें भारतांतील आयुर्विम्याचे कामांत खूपच घट झाली. १९५५ मध्यें २३८ कोटी रु. चें काम पुरें झालें होतें; १९५४ मध्यें हा आंकडा २३६ कोटी रु. होता. १९५६ मध्यें मात्र तो १८८ कोटी रु. वर घसरला. १९५३ मध्यें १५५ कोटी रु. चें काम पुरें झालें होतें, त्यामानानें मात्र १९५६ मध्यें काम जास्त झालें. आयुर्विम्याचें राष्ट्रीयकरण झालें, त्याचा हा बहुंशीं परिणाम आहे. कॉर्पोरेशनच्या विभागीय कचेऱ्यांची नीट व्यवस्था लागायला वेळ लागला आणि नोकर व एजंट ह्यांना नव्या घडीशीं समरस व्हायला सोपें गेलें नाहीं.

तथापि, १९५६ मध्यें काम कमी होण्यास इतरहि कारणें आहेत. १९५४ मध्यें हप्त्यांचे दर एकदम उतरविले गेले, त्यामुळें पुष्कळ विमेदारांनीं जुने विमे पेड-अप करून नव्या पॉलिसी घेतल्या. ह्या एकाच कारणामुळें नव्या कामांत १९५४ मध्यें व १९५५ मध्यें प्रत्येकीं ३५ कोटी रुपयांची भर पडली असेल असा अंदाज आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे १९५४ व १९५५ मध्यें कित्येक मोठ्या कंपन्यांनीं स्टाफ इन्शुअरन्स योजनांखाली विम्याचें खूपच काम मिळविलें. १९५५ चे अखेरीस ह्या योजना बंद करण्यांत आल्या. परंतु त्यापूर्वी १८ कोटी रुपयांचें काम होऊन गेलें होतें. त्याच-प्रमाणें एस्टेट ड्यूटी पॉलिसी व मॅरीड वुइमेन्स प्रॉपर्टी ॲक्ट पॉलिसी ह्यांची संख्याहि दोन्हीं वर्षी मोठी भरली. १९५६ मध्यें त्यांचा बहर कमी झाला.

## भारतांत अणुशक्ति वापरण्याची शक्यता

भारताच्या अणुशक्ति-मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं देशांत अणुशक्तीचा वापर करणें कितपत व कसें शक्य आहे ह्याविषयीं आपले विचार बोलून दाखविले आहेत. मुंबई येथें अणुशास्त्रज्ञांना व एंजिनिअर्सना शिक्षण देण्यासाठी जी शाळा स्थापन करण्यांत आली आहे, तीमधील विद्यार्थ्यांसमोर भाषण करतांना ते म्हणाले कीं, शास्त्रीय क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करून दाखविण्याची व देशाची सेवा करण्याची संधी तरुण पिढीला मिळत आहे. अशी संधी मागील कोठल्याहि पिढीला मिळालेली नाहीं. अणुशक्तीविषयीं लोकसभेंत जी चर्चा झाली तींत सर्व सभासदांनीं असा आग्रह धरला होता कीं, देशांत पैशाची टंचाई कितीहि भासत असली तरी अणुशक्तीच्या विकासासाठी लागणारा सर्व पैसा मंजूर करण्यांत यावा. कांहीं सभासदांनीं तर मागणी करण्यांत आलेल्या पैशापेक्षाहि अधिक द्रव्य देण्यांत यावें असें सुचविलें. अणुशक्तीच्या विकासाबद्दल लोकसभेंत जी वृत्ति दिसून आली तिचा अर्थ असा आहे कीं, देशाच्या आर्थिक विकासांत ह्या शक्तीला असलेल्या महत्त्वाची जाणीव अधिकाधिक होऊं लागली आहे.

भारतांत १९६५ च्या सुमारास १० लाख किलोवॅट वीज अणुशक्तीच्या साह्यानें निर्माण करणारें केंद्र उभारणें केवळ तांत्रिक दृष्टीनें विचार केला तर शक्यतेच्या कोटींत आहे. अर्थात् अशा केंद्राची उभारणी केली जाईल किंवा नाहीं हा प्रश्न मुख्यतः आर्थिक स्वरूपाचा राहील. आज तांत्रिक दृष्ट्या अशी परिस्थिति आहे कीं अणुशक्तीच्या साह्यानें उत्पन्न केल्या जाणाऱ्या विजेचा उत्पादन खर्च दर युनिटमागें ०.७ आणे इतकाच येईल. अमदाबाद, दिल्ली व मद्रास ह्या शहरांतून साध्या कोळशाच्या जळणाच्या साह्यानें विजेची निर्मिति करण्यांत येते. ह्या विजेचा उत्पादन-खर्च वरील खर्चाच्या आसपासच येईल. कारण हीं ठिकाणें कोळशाच्या खाणींपासून दूर आहेत. त्या ठिकाणीं अणुशक्तीच्या साह्यानें स्पर्धेच्या दरानें वीज निर्माण करतां येणें शक्य आहे. कोळशाच्या जळणाचा उपयोग करणाऱ्या वीज-निर्मिति केंद्राएवढेंच केंद्र अणुशक्तीच्या साह्यानें चालविण्याचें ठरलें तर त्याच्या उभारणीसाठी भांडवली खर्च ५० टक्के अधिक येईल हें खरें. पण कोळशाचें उत्पादन वाढविण्यासाठी जी यंत्रसामुग्री खाणींत बसवावी लागेल आणि त्याची वाहतूक करण्यासाठी रेल्वे मार्गावर जें भांडवल गुंतवावें लागेल, त्यांचाहि विचार केला पाहिजे. अणुशक्तीच्या वीज-केंद्रासाठी लागणारा अधिक भांडवली खर्च ह्या खर्चाशीं ताडला जाणें आवश्यक आहे.

भारताच्या अणुशक्ति-विकास खात्यानें अणुशक्तीचा विकास करण्यासाठी १५ वर्षांचा एक कार्यक्रम तयार केलेला आहे. ह्या कार्यक्रमाच्या अमलबजावणीशीं संबंध येणाऱ्या सरकारच्या इतर खात्यांचें सहकार्य मिळविण्यांत येत आहे. विशेषतः रेल्वेबोर्डाशीं अधिक निकटचा संपर्क ठेवण्यांत येत आहे. गेल्या वर्षी नवीन प्रकारचे धातू बनविण्याच्या कामीं यश आलें आहे. ह्या नव्या शोधांमुळें अणुशक्तीवर वीज निर्माण करणाऱ्या केंद्राचा भांडवली खर्च बराच कमी होण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. अणुशक्तीचा विकास करतांना पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, धातुशास्त्र, जीवशास्त्र, इत्यादि शास्त्रीय शास्त्रांत संशोधन करण्यासारखीं नवीं क्षेत्रेंहि निर्माण झालेलीं आहेत.

---

## मुंबई राज्याचें वेअरहौसिंग कॉर्पोरेशन

मुंबई राज्य सरकारनें आपलें वेअरहौसिंग कॉर्पोरेशन स्थापन करण्याचें ठरविलें आहे. सुरवातीला कॉर्पोरेशनचें वसूल भांडवल १४ लाख रुपयांचें राहणार आहे. ह्या भांडवलापैकीं निम्में भांडवल सेंट्रल वेअरहौसिंग कॉर्पोरेशन देणार असून बाकीचें राज्य सरकार पुरविणार आहे. बॉंबे स्टेट वेअरहौसिंग कॉर्पोरेशन ह्या नांवानें तें स्थापन करण्यांत येईल. ह्या कॉर्पोरेशनकडे दुय्यम प्रतीच्या बाजारपेठांच्या गांवीं गुदामें बांधण्याचें काम सोंपविण्यांत येईल. व्यापारी दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणीं गुदामें उघडण्याचें काम सेंट्रल कॉर्पोरेशन करणार आहे. गुदामांच्या स्थापनेच्या ह्या योजनेचा अंतर्भाव दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत आला असून ह्या कामासाठी ६५ लाख ५४ हजार रुपयांची तरतूदहि करण्यांत आली आहे. कॉर्पोरेशनची स्थापना पुढील हेतु साध्य करण्यासाठी करण्यांत येत आहे. (१) योग्य अशा ठिकाणीं मालाच्या साठवणीसाठी गुदामें मिळविणें आणि बांधणें (२) व्यक्ति अगर सहकारी संस्था ह्यांच्या शेतीच्या मालाची, बीं-बियाणाची, खताची व शेतीच्या अवजारांची सांठवण करणें व व्यवस्था ठेवणें आणि (३) शेतीचा माल गुदामापर्यंत आणून पोंचविण्याची आणि तो गुदामापासून दूर नेण्याची वाहतुकीची व्यवस्था करणें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत सेंट्रल कॉर्पोरेशनतर्फे २० गुदामें आणि राज्याच्या कॉर्पोरेशनतर्फे ६० गुदामें बांधलीं जावीं अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. शेतीच्या हंगामाच्या वेळीं छोट्या मुदतीचीं जीं कर्जे शेतकऱ्यांना द्यावीं लागत तीं मिळण्यास ह्या सांठवणीच्या पद्धतीचा चांगला उपयोग होईल. कारण, गुदामाच्या अधिकाऱ्यानें दिलेल्या पावतीचा उपयोग तारण म्हणून करतां येईल.

---

## भारत व पश्चिम जर्मनी ह्यांच्यामधील व्यापार

भारत व पश्चिम जर्मनी ह्यांच्या दरम्यान गेल्या एप्रिल महिन्यांत व्यापारी वाटाघाटी झाल्या होत्या. त्यावेळीं पश्चिम जर्मन सरकारनें भारताच्या प्रतिनिधींचें एक मंडळ जर्मनीस पाठविण्याची सूचना केली होती. त्या सूचनेस अनुसरून भारतामधील व्यापाऱ्यांचें व उद्योगपतींचें एक मंडळ लवकरच जर्मनीस पाठविण्यांत येणार आहे. ह्या मंडळांत १५ ते २० प्रतिनिधी असतील असें समजतें. उभयतां देशांतील व्यापारी संबंध अधिक दृढ करणें आणि भारताच्या मालाला पश्चिम जर्मनीच्या बाजारपेठेंत कितपत वाव आहे तें पहाणें, अशा उभयविध हेतूनें मंडळ पाठविण्यांत येणार आहे. १९४८ पासून उभयतां देशांत वेळोवेळीं व्यापारी करार करण्यांत येत आहेतच. गेल्या कांहीं वर्षांत जर्मनीकडून भारतांत आयात करण्यांत येणाऱ्या मालांत खूपच वाढ झालेली आहे; उलटपक्षी, भारताकडून जर्मनीला जाणाऱ्या मालांत मात्र वाढ झालेली नाहीं. १९४९-५० सालीं भारतानें जर्मनीकडून घेतलेल्या मालाची किंमत ६ कोटी रुपये होती. गेल्या पांच-सहा वर्षांत जर्मनीकडून आयात केलेल्या मालाची किंमत १० पटींनें वाढून ६० कोटी रुपयांच्या घरांत आली आहे. १९५६-५७ सालांत तर आयात मालाची किंमत ९० कोटी रुपयांपेक्षाहि अधिक होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्याच वर्षी भारतानें निर्यात केलेल्या मालाची किंमत सुमारें १५ कोटी रुपयांपेक्षा अधिक होण्याची शक्यता नाहीं. पश्चिम जर्मन सरकारनें जितका माल निर्यात करण्याची परवानगी भारतीय व्यापाऱ्यांना दिली होती, तितका तें निर्यात करूं शकत नाहींत. शिवाय, ह्या परिस्थितीला दुसरेंहि एक कारण आहे. पश्चिम जर्मनीला भारताकडून निर्यात करण्यांत येणारा माल पुष्कळदां ब्रिटन अगर हॉलंडसारख्या दुसऱ्या देशांच्या मार्फत जात असतो.

# भारत सरकारचीं अंदाजपत्रकें व करवाढ

मध्यवर्ती सरकारचा वाढता खर्च व त्यासाठीं सालोसाल करण्यांत येणारी करवाढ हीं त्यापासून होणाऱ्या हिताच्या दृष्टीनें समर्थनीय आहे किंवा नाहीं असा प्रश्न आतां वारंवार विचारला जातो. भारत सरकारच्या अंदाजपत्रकांतील उत्पन्न–खर्चाचे आंकडे खाली दिले आहेत, त्यावरून सरकारच्या वाढत्या उत्पन्न-खर्चाची कल्पना येईल. खरी तुलना १९४८–४९ नंतरच्या वर्षांचीच करतां येईल. स्वातंत्र्यप्राप्तिनंतरचें पहिलें आर्थिक वर्ष १५ ऑगस्ट, १९४७ रोजीं सुरू होऊन ३१ मार्च, १९४८ रोजीं संपलें. त्या वर्षाचे आंकडेहि तुलनेसाठीं घेतां येणार नाहींत. कराच्या उत्पन्नांत कस्टम्स, एक्साईज, इन्कम टॅक्स, कॉर्पोरेशन टॅक्स, इत्यादींचा प्रामुख्यानें समावेश होतो.

**भारत सरकारचीं अंदाजपत्रकें**
**( आकडे कोटी रुपयांचे )**

| | १९३९-४० | १९४६-४७ | १९४७-४८ | १९४८-४९ | १९४९-५० | १९५०-५१ | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | १९५४-५५ | १९५५-५६ | १९५६-५७ | १९५७-५८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न | ९४·५७ | ३४२·८९ | १७८·७७ | ३७१·७० | ३५०·३९ | ४१०·६६ | ५१५·३६ | ४३५·११ | ४१५·९८ | ४५६·१३ | ५०१·६७ | ५७१·४९ | ७१२·८२ |
| करापासून उत्पन्न | ८०·६७ | २७४·४६ | १६२·०५ | ३१९·९४ | ३११·५४ | ३५७·०० | ४५९·९९ | ३८७·०६ | ३६३·२८ | ३९९·२६ | ४२६·११ | ४२४·६९ | ... |
| खर्च | ९४·५७ | ३४३·४५ | १८५·२९ | ३२०·८६ | ३१७·१२ | ३५१·४४ | ३८७·२७ | ३९६·१८ | ४०७·४८ | ४२२·६२ | ४८९·३६ | ५३५·५५ | ६६८·०९ |

तक्त्यावरून दिसून येईल, कीं भारत सरकारचा खर्च १९४८–४९ मध्यें ३२१ कोटी रु. होता, तो चालू वर्षी ६६८ कोटी रु. वर गेला आहे; म्हणजे खर्चांत १०८·२% वाढ झाली आहे. ह्याच मुदतींत मध्यवर्ती करांचा बोजा ३२० कोटी रु. वरून ४२५ कोटी रु. वर गेला आहे; म्हणजे करांत ३२·७% वाढ झाली आहे. किंमतींमध्येंच मोठी वाढ झाली असल्याकारणानें आणि सरकार हेंच बाजारांतील सर्वांत मोठें गिऱ्हाईक असल्यामुळें सरकारी खर्चांत वाढ होणें अपरिहार्य आहे. ह्या दृष्टीनें विचार केला, तर घाऊक किंमतींचा निर्देशांक ( ऑगस्ट १९३९ = १०० ) एप्रिल, १९५७ मध्यें ४२२·१ पर्यंत पोचला आहे. १९४८–४९ मध्यें हा निर्देशांक ३६७·२ होता; म्हणजे १९४८–४९ चे मानानें किंमतींत १२·२% वाढ झाली आहे. त्या प्रमाणांतच किंमतवाढ सरकारी खर्चाच्या वाढीस कारणीभूत आहे.

सरकारनें खर्चाला लागणारा पैसा कसा जमविला, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल :—

**मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नाच्या प्रमुख बाबी**
**( आकडे कोटी रुपयांचे )**

| | १९४७-४८ | १९४८-४९ | १९४९-५० | १९५०-५१ | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५३-५४ | १९५४-५५ | १९५५-५६ | १९५६-५७ दुरुस्त | १९५७-५८ बजेट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कस्टम्स | ५४·५० | १२६·१६ | १२४·७१ | १५७·१५ | २३१·६९ | १७३·७५ | १५८·७१ | १८४·८६ | १६५·०० | १७७·०० | १६८·०० |
| एक्साइज | २०·७२ | ५०·६३ | ६७·८५ | ६७·५४ | ८५·७८ | ८३·०३ | ९४·९८ | १०८·२२ | १४०·०० | १८९·०० | २५८·४३ |
| कॉर्पोरेशन टॅक्स ( एक्सेस प्रॉफिट टॅक्स ) | ४०·४३ (२६·१५) | ६२·२६ (१४·३८) | ३९·५३ (३९·८) | ४०·४९ | ४१·४१ | ४३·८० | ४१·५४ | ३७·३३ | ३९·८४ | ४८·२४ | ५४·७५ |
| कॉर्पोरेशन टॅक्स वगळून बाकीचे इन्कम टॅक्स ( एक्सेस प्रॉफिट्स टॅक्स ) | ७४·५७ (४·९०) | ११९·५० (८·११) | १२१·५९ (३·४६) | १३२·७३ | १४६·१९ | १४१·४३ | १२२·८४ | १२२·२६ | १३३·६६ | १४१·०० | १५२·८५ |

पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षी ( १९५१–५२ ) कस्टम्सचें उत्पन्न सर्वांत जास्त (२३२ कोटी रु.) होतें; तेव्हांपासून तें उतरत गेलें आहे. चालू वर्षाच्या बजेटांत तें गेल्या वर्षापेक्षांहि ९ कोटी रु. नीं कमी आहे. जरूर नसलेल्या जिनसांच्या आयातीवर बंधनें ठेवण्याच्या सरकारी धोरणाचा तो स्वाभाविक परिणाम आहे. १९५१–५२ चे मानानें आतां कस्टम्सचें उत्पन्न २७·५% कमी आहे. कस्टम्सचें उत्पन्न कमी झालें. त्यामुळेंच मध्यवर्ती एक्साईज ड्यूटींचें उत्पन्न वाढवतां आलें. १९४८–४९ मध्यें ह्या ड्यूटींनीं सरकारला फक्त ५१ कोटी रु. दिले होते; आतां त्यांचें उत्पन्न २५८ कोटी रु. झालें आहे; म्हणजे तें ४१०% वाढलें आहे.

कॉर्पोरेशन टॅक्स १९५१–५२ मध्यें ४१·४१ कोटी रु. वसूल झाला; चालू वर्षी तो ५४·७५ कोटी रु., म्हणजे ३२·२% जास्त होईल. गेल्या कांहीं वर्षांत कितीतरी नव्या कंपन्या निघाल्या; त्यामानानें कॉर्पोरेशन टॅक्स वाढला नाहीं. ह्याचें कारण, एक्साईज ड्यूटींमुळें प्रमुख उद्योगधंद्यांचे नफे कमी झाले आणि त्या नफ्यावरील करहि अधिक वाढूं शकले नाहींत. सरकारनें वेळोवेळ दिलेले रिबेट, वहातुकीच्या दरांत वाढ, कच्च्या मालाची वाढती किंमत, सरकारचें मजुरीविषयक धोरण, ह्यामुळेंहि कंपन्यांच्या नफ्यावर प्रतिकूल परिणाम झाला. इन्कम टॅक्सचें उत्पन्नहि फारच थोडें वाढलें आहे : १४६ कोटी रुपयांचें तें १५३ कोटी रु. झालें आहे.

मध्यवर्ती सरकारच्या खर्चाच्या प्रमुख बाबी पाहिल्या, तर लष्करी आणि मुलकी दोन्ही खर्चांत वाढ झालेली दिसून येते.

मध्यवर्ती सरकारच्या खर्चाच्या प्रमुख बाबी
(आकडे कोटी रुपयांचे)

| | मुलकी खर्च | लष्करी खर्च |
|---|---|---|
| १९४८–४९ | १७४·८१ | १४६·०५ |
| १९४९–५० | १६८·२६ | १४८·८६ |
| १९५०–५१ | १८७·३१ | १६४·१३ |
| १९५१–५२ | २१६·३१ | १७०·९६ |
| १९५२–५३ | २१६·६६ | १७९·५२ |
| १९५३–५४ | २२१·१८ | १८६·३० |
| १९५४–५५ | २३५·९६ | १८६·६६ |
| १९५५–५६ | ३०४·२९ | १८५·०७ |
| १९५६–५७ | ३४१·४६ | २०३·९७ |
| १९५७–५८ | ४१५–३९ | २५२·७० |

**जागतिक बँकेचें सयामला कर्ज**—सयामच्या सरकारनें उत्तर सयाममध्यें पाण्याच्या प्रवाहावर वीज निर्माण करण्याचें केंद्र उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं सरकारला जागतिक बँकेकडून ६·६ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर झालें आहे. धरणाच्या प्राथमिक कामासाठीं सयामच्या सरकारला ३·४ कोटी डॉलर्स स्वतः उभारावे लागतील.

**सूदानच्या कापसाची मागणी**—सूदानमध्यें पिकणारा कापूस व इतर कच्चा माल विकत घेऊन तो पूर्व युरोपमधील बाजारपेठेंत खपविण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. आतांपर्यंत सूदानचा कापूस मुख्यतः ब्रिटन व पश्चिम युरोपांतील देश ह्यांना निर्यात करण्यांत येत असे. पण ह्या वर्षी चढ्या किंमतीमुळें बराचसा कापूस गिऱ्हाइकांच्या अभावीं सूदानमध्येंच पडून आहे.

**जर्मनीहि अणुबाँब करणार**—अणु व हैड्रोजन बाँम्ब तयार करण्याच्या स्पर्धेत आतां जर्मनीहि भाग घेणार, अशी वार्ता आहे. पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी ह्या दोन्ही भागांतील शास्त्रज्ञ अशा प्रकारचीं शस्त्रें तयार करण्याच्या विरुद्ध असूनहि जर्मनीचें राजकीय एकीकरण होत असल्यामुळें दोन्ही भागांतील सरकारें अणुशस्त्रसज्ज रहाण्याची तत्परता दाखविण्याचा संभव आहे.

**रेडिओवर कैद्याचा कार्यक्रम**—त्रिवेंद्रम येथील मध्यवर्ती तुरुंगांत खुनाबद्दल शिक्षा झालेला ४० वर्षे वयाचा एक कैदी आहे. तो संगीतज्ञ असून आपला कार्यक्रम रेडिओवर ठेवावा अशी विनंती त्यानें राज्याच्या कायदेमंत्र्यांना केली. कायदेमंत्र्यांनीं त्याचें गाणें ध्वनिमुद्रित करवून त्रिवेंद्रमच्या रेडिओ-केंद्रावर प्रसारित करण्याची व्यवस्था केली. कार्यक्रमाचा मेहनताना त्याच्या कुटुंबियांकडे पाठविण्यांत आला.


## फक्त पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांकरितां

## -- सूचना. --

पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक, लि. ची ४० वी वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक १५ सप्टेंबर १९५७ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालय हायस्कूलचे सभागृहांत भरणार आहे.

सदर सभेमध्यें खालील कामें करण्यांत येतील.

(१) दिनांक १६–९–१९५६ रोजीं झालेल्या वार्षिक साधारण सभेचा, सदर सभा तहकूब झाल्यानें दि. २९ सप्टेंबर १९५६ रोजीं झालेल्या सदर तहकूब वार्षिक साधारण सभेचा व दि. २३ जून १९५७ रोजीं झालेल्या चर्चात्मक सभेचा वृत्तांत वाचून कायम करणें. (तिन्ही वृत्तांत टेबलावर ठेवले आहेत).

(२) दि. ३० जून १९५७ रोजीं संपणाऱ्या सालांतील बँकेच्या कामकाजाचा अहवाल व नफा–वाँटणीपत्रकासह ताळेबंदाचा विचार करणें.

(३) बोर्डाच्या निकालाविरुद्ध कांहीं तक्रारी असल्यास त्या ऐकून त्याचा निकाल करणें.

(४) सन १९५७–५८ सालाकरितां नेमावयाच्या बँकेच्या हिशेब–तपासनिसांचें वेतन ठरविणें.

(५) पुढील सालाकरितां बँकेचे संचालक (अध्यक्ष, उपाध्यक्ष) निवडणें व हिशेब–तपासनीस नेमणें.

(६) पोट–नियमांत सुचविलेल्या खालील दुरुस्त्यांचा विचार करणें.

(अ) पोट–नियम नं. २९ (२), ३३, ३५, ३६, ४० (११) (अ), ४२ व ४५ यांमध्यें संचालकमंडळानें सुचविलेल्या व मान्य केलेल्या दुरुस्त्या.

(आ) पोट–नियम नं. ४० (१२) साधारण सभेनें संमत करून तो मा. रजिस्ट्रारसाहेब यांचेकडे मंजुरीसाठीं पाठविला होता. तो त्यांनीं नामंजूर करून त्याऐवजीं सुचविलेला दुरुस्त पोट–नियम.

(इ) पोट-नियम नं. ३ (६) ला अनुसरून (हुंडी व्यवहाराबाबत) मा. रजिस्ट्रारसाहेब यांनीं सुचविलेला नवीन पोट-नियम नं. ३ (६) (अ).

(ई) बँकेच्या उद्देशामध्यें खालील उद्देश अंतर्भूत करणें-नवीन पोट-नियम नं. ३ (१०) (अ).

(उ) बँकेच्या नवीन सुचविलेल्या पोट-नियम नं. ३ (१०) (अ) मधील उद्देशास अनुसरून पोट-नियम नं. ४० (११) (ब) स्वीकारणें.

(७) संचालकमंडळानें सेव्हिंग्ज बँक ठेव नियम क्र. ९, मुदतीच्या ठेवी मुदत भरण्यापूर्वी परत करण्याबाबतच्या नियमांमध्यें व नोकरीचे नियम नं. ७८, २३ व २८ मध्यें दुरुस्ती केली आहे. ग्रॅच्युइटी फंडाचे नियम मंजूर केले आहेत त्या पोट-नियम नं. ७७ अन्वयें साधारण सभेस सादर.

(८) ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा मा. अध्यक्ष यांचे परवानगीनें विचार करणें.

वार्षिक सभेचे वेळीं सभासदांस कांहीं माहिती विचारावयाची असल्यास त्यांनीं आपली विचारणा लेखी स्वरूपांत दि. ३ सप्टेंबर १९५७ रोजीं दुपारीं ४ वाजण्यापूर्वी मुख्य कचेरींत कार्यकारी संचालक यांजकडे आणून द्यावी.

नवीन सालच्या संचालकमंडळाच्या निवडणुकीकरितां व हिशेब-तपासनिसांचे नेमणुकीकरितां मतें देण्याची वेळ दि. १५ सप्टेंबर १९५७ रोजीं सकाळीं ८-३० ते दुपारीं १२वाजेपर्यंत आहे.

सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

संचालक मंडळाच्या आज्ञेनें
वा. ग. अळतेकर,
कार्यकारी संचालक.

# मुंबई राज्यांतील सहकारी चळवळ

## चार सहकारी कारखाने सुरू

अठरा सहकारी पद्धतीच्या साखर कारखान्याची नोंद करून या राज्यानें याबाबतींत अग्रेसरत्व मिळविलें असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ठेवलेले आणखी चार साखर कारखाने नोंदविण्याचें उद्दिष्टहि यापूर्वींच साध्य करण्यांत आलें आहे. १९५६–५७ सालीं सात सणसर कारखाने स्थापन करण्याचें काम सुरू होतें व त्यांपैकी संसार आणि बारडोली येथील कारखान्यांतून उत्पादनाचें काम अनुक्रमें १७ जानेवारी आणि २१ एप्रिल १९५७ पासून सुरूहि झालें आहे. अशा रीतीनें आतां प्रत्यक्षांत चार सहकारी साखर कारखाने सुरू झाले आहेत. याच वर्षी आठ नव्या कारखान्यांसाठी लागणारी यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे. अलीकडेच, एक अपवाद सोडून, या सर्व साखर कारखान्यांना पश्चिम जर्मनींतून यंत्रसामुग्री आयात करण्याचे परवाने भारत सरकारकडून मिळाले आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखाली नोंदविण्यांत आलेल्या तीन नव्या कारखान्यांना १९५१ च्या इंडस्ट्रिज ॲण्ड रेग्युलेशन्स कायद्याखाली लायसेन्सें मिळालीं आहेत. सहकारी कारखान्यांच्या शेअर भांडवलामध्यें २८ लाख रुपये गुंतविण्यांत आले असून इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशननेंहि पांच कारखान्यांना कर्ज मंजूर केलें आहे.

### घरबांधकाम सोसायट्या

मुंबई को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटी ही अशा तऱ्हेची सर्वोच्च सोसायटी असून इतर सहकारी घरबांधकाम सोसायट्यांना पैसा पुरविण्याचें तिचें उद्दिष्ट आहे. सदरहू सोसायटीनें आपल्या सभासदांकडून ५० लाख रुपये गोळा केले तर मुंबई सरकारनेंहि तिचे ५० लाख रुपयांचे शेअर खरेदी करण्याचें मान्य केलें आहे. सरकारनें भाग भांडवल परत करण्याची आणि साडेतीन टक्के डिव्हिडंट देण्याची हमी घेतली आहे. ३१ मार्च १९५६ रोजीं सरकारनें या सोसायटीचे ३४,१०,००० रुपयांचे शेअर घेतले होते. सदरहू सोसायटीच्या स्थापनेपासून एकूण ७२·२३ लाख रुपयांचीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं असून ३० जून १९५६ पर्यंत ६५·२५ लाख रुपये प्रत्यक्ष वाटण्यांत आलें आहेत. या आर्थिक मदतीच्या साह्यानें १,२६१ गाळे बांधणें शक्य झालें आहे. कमी मिळकतीच्या लोकांसाठी घरें बांधावयाच्या योजनेची अंमलबजावणी करण्याचें काम मुंबई को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीवर सोपविण्यांत आलें आहे. सौराष्ट्र, कच्छ आणि मराठवाडा या भागांत सध्यां या योजनेची अंमलबजावणी खात्यामार्फत करण्यांत येत असून विदर्भ विभागांत या योजनेखाली विदर्भ हौसिंग बोर्डामार्फत कर्जें दिलीं जातात. ही योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आली असून सुमारें २,००० गाळे बांधण्यासाठी कर्जें देण्याकरितां एकूण १२४·४८ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. १९५६–५७ सालीं एकूण १०·४ लाख रुपयांचीं कर्जें वांटण्यांत आलीं. सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी कर्ज म्हणून २१·१९ लाख रुपयांची आणि आर्थिक मदतीदाखल १०·६५ लाख रुपयांची तरतूद पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आली असून प्रत्येकी ३० गाळे बांधणाऱ्या ४५ घरबांधकाम–सोसायट्या स्थापण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. १९५६–५७ सालीं २० सोसायट्यांना २·६४ लाख रुपयांचें कर्ज आणि १ ते ७० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यांत आली. हें कर्ज म्हणजे पूर्वीच्या वर्षी मंजूर केलेल्या कर्जाचा दुसरा हप्ता होय.

सदरहू योजनेखाली आतांपर्यंत एकूण ५८९ घर–बांधकाम सोसायट्या नोंदविण्यांत आल्या असून त्यांपैकी १२२ सोसायट्यांना पैसा पुरविण्यांत आला आहे. आतांपर्यंत या सोसायट्यांना ४८·२५ लाख रुपयांचें कर्ज आणि ८·१० लाख रुपयांची मदत देण्यांत आली आहे.

---

**ह्या पैशाला मालक नाहीं!**—१९५६ च्या जानेवारी महिन्याच्या प्रारंभीं भारतामधील बँकांतून १·८२ कोटी रुपयांच्या रकमांवर हक्क सांगणारा कोणी नव्हता. १९५५ सालच्या सुरवातीपेक्षा ही रक्कम ६ लाखांनीं जास्त आहे. वर्गवारी अशी आहे. सेव्हिंग्ज डिपॉझिट ९४ लाख, चालू डिपॉझिट ४४ लाख, मुदतीच्या ठेवी ३७ लाख, इतर ६ लाख, व व्याज १ लाख.

**कर्जाचा अनधिकृत वापर**—केरळ सरकारनें छोटे उद्योगधंदे काढण्यासाठी दिलेल्या दोन कर्जाचा कर्ज घेणाऱ्यांनीं दुरुपयोग केल्याचें आढळून आलें आहे. एकानें साबणाचा कारखाना काढण्यासाठी कर्ज घेतलें व त्याचा उपयोग करून चहाचें दुकान घातलें. दुसऱ्या एका कारखानदारानें खोटीं आश्वासनें देऊन कर्ज मिळविलें. कर्जाची शिफारस करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून खुलासा मागण्यांत आला आहे.

**धरणासाठी मदतीची मागणी**— आंध्र राज्यांतील श्रीकाकुलम् जिल्ह्यांत बांधण्यांत येणाऱ्या धरणाच्या पहिल्या हप्त्यासाठी राज्य सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे ५ कोटी रुपयांचें कर्ज मागितलें आहे. धरणाच्या प्राथमिक कामासाठी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली असून योजनेची विमानांतून पहाणी पूर्ण करण्यांत आली आहे.

**भोजनाचे डबे बांधूं नका**—आगगाड्यांचे भोजनाचे डबे बांधण्याचें काम बंद करण्यांत यावें अशा सूचना रेल्वेबोर्डानें दिल्या आहेत. रेल्वेच्या डब्यांतून प्रवाशांची अतिशय गर्दी होत आहे. ती कमी करण्यासाठी ह्याच सामानाचा उपयोग करून प्रवासी डबे बांधण्यांत येणार आहेत.

**अमेरिकेच्या मदतीचा दुरुपयोग**—पाकिस्तान फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्या उद्योगपतींच्या संघटनेनें पाकिस्तानचें सरकार अमेरिकेकडून मिळालेल्या आर्थिक मदतीचा दुरुपयोग करीत आहे, अशी टीका केली आहे. चालू उद्योगधंद्यांचें आधुनिकीकरण करण्याऐवजीं नव्या उद्योगधंद्यांच्या स्थापनेंत मदतीचा अपव्यय करण्यांत येत आहे, असा आरोप करण्यांत आला आहे.

**विजेवर चालणारी मोठी यारी**—कलकत्ता येथील बंदरांत एकाच वेळीं २०० टन वजन उचलूं शकणारी विजेवर चालणारी मोठी यारी बसविण्यांत आली आहे. पूर्वेकडील देशांत ही यारी सर्वांत मोठी आहे असें म्हणतात. ह्या यारीच्या साह्यानें भारी वजनाचा माल चढविता अगर उतरविता येणें सुलभ होणार आहे. यारीची किंमत १९ लाख रुपये आहे.


**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक :–श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व इलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,००,०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

व्हा अगर अधिक वर्षे रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | २-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



# अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— व. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



## कण आणि क्षण

ह्या अत्यंत लोकप्रिय ( दोन वर्षांत दोन मराठी व दोन गुजराती आवृत्त्या ) पुस्तकाचे कर्ते श्री. श्री. वा. काळे संपादक, "अर्थ" ह्यांचें

# पुढे पाऊल

चित्ताकर्षक विवेचन असलेल्या मार्गदर्शक लघुनिबंधांचा संग्रह.

पृ. सं. १३२ ] आर्यभूषण प्रेस, पुणें ४. [ किंमत २ रु.



# दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

गेलीं १७ वर्षे सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. २,८७,००० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | | |
|---|---|---|
| १ व २ वर्षे मुदत | द. द. शें. | ३ टक्के |
| ३ „ „ | „ | ३। „ |
| ४ „ „ | „ | ३॥ „ |
| ५ „ „ | „ | ४ „ |
| सेव्हिंग्ज बँक | „ | २ „ |
| होम सेव्हिंग्ज बँक | „ | २½ „ |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठीं क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षे सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेट्सहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठीं समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर



स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. २

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० „ |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० „ |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, ( ऑ. ट्रेझरर )
श्री. आनंदराव पांडुजी ढोरे सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन „
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे „
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख „
श्री. मनोहर रामजी नेहरकर „

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.